पुढारी

# सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रयत्न करणार

## गायत्री पवार -केतकर : सांगलीत मराठा छावणी, क्लिक हिल फौंडेशनचा उपक्रम

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

सायबर गुन्हे रोखण्यासाठी मराठा छावणी व क्लिक हिल फौंडेशनच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहे, अशी माहिती क्लिक हिलच्या समन्वयक गायत्री पवार - केतकर यांनी दिली.

पवार म्हणाल्या, सध्या सायबर गुन्हेगारी वाढत आहे. निरपराध लोक याला बळी पडत आहेत. गुन्हेगार नुसतेच खात्यामधून पैसे काढत नाहीत तर आता नवनव्या ब्लॅकमेलच्या पद्धती अवलंबत आहेत. ज्यामध्ये बळी ठरलेल्या व्यक्तीबरोबर त्याचे कुटुंब, इष्ट मित्र हे सुद्धा टार्गेट केले जात आहेत. सायबर फसवणूक आणि गुन्हेगारी वाढत असून याला आळा कसा घालावा हे जनसामान्य लोकांना माहीत नाही.



**सांगली : सायबर गुन्ह्यासंदर्भात येथे झालेल्या बैठकीत मराठा छावणी, क्लिक हिल फौंडेशनचे पदाधिकारी.**

क्लिक हिल फौंडेशन या समाज सेवी संस्थेने, सायबर सुरक्षा जागरूकता ही लोकांपर्यंत पोचावी यासाठी उत्तम मार्गदर्शिका तयार केली असून तो तरुणांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे.

त्या म्हणाल्या, यामध्ये विविध सायबर घोटाळे कसे घडतात आणि घडलेच तर स्वतःला सुरक्षित कसे करायचे आणि कुठे व कशी तक्रार नोंदवावी, हे सोप्या भाषेत नमूद केले आहे.

यावेळी श्रीकांत शिंदे, संगीता मोरे, सर्जेराव पाटील, संजय कोरे, सचिन सगरे, विवेक पवार, अ‍ॅड. अवधूत देशपांडे, सुयोग हावळ, ओंकार पाटणे आदी उपस्थित होते.

My Sangli Edition
Sep 14, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in